# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18 / 08 / 2023 (शुक्रवार) दुपार

## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत मौजा मेटपांझरा ता. काटोल येथे दिनांक १५/०८/२०२३ चे ०२.३० वा. ०२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुरेन्द्र शंकरलाल बजाज, रा. मेटपांझरा ता. काटोल हे इंन्फ्रा इंडीसा प्रायव्हेट लिमीटेड या कंपनीमध्ये मॅनेजर म्हणुन काम करीत असुन नागपुर काटोल रोडवरील कामाचा ठेका घेतलेला असुन दि. १६/०८/२०२३ चे सकाळी ९/०० वा. दरम्यान रोडचे काम चालु असलेल्या ठिकाणी गेले असता कॅम्प मध्ये उभे असलेल्या मशनरी जवळ चार कॅम्प व रबर पाईप तसेच मशनरी मधील डिझेल खाली जमिनीवर सांडलेले दिसले . यावरून फिर्यादी यांनी मशनरी जवळ जावुन पाहीले असता मशनरी मधुन अंदाजे १०० लिटर डिझेल प्रत्येकी ९३/— रू प्रमाणे एकुण किंमती ९३००/—रू. चे डिझेल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक निलेश तायडे मो. क्र. ७९७२३५९९६३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा खुर्सापार शिवार येथे दिनांक ०२/०८/२०२३ चे ०८/०० वा. ते दिनांक ०३/०८/२०२३ चे ०९/०० वा. सुमारास मौजा खुर्सापार शिवारातील रिलायंस टावर मधील १०० ए. एच. ३ बॅटरी, ७५ ए. एच. च्या ३ बॅटरी अशा एकुण ६ बॅटरी कॉसलाईट कंपनीच्या प्रती नग बॅटरी रू. ५०००/— एकुण ३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रदीप भाऊराव मेन, वय ४५ वर्ष रा. १७/१२ आय. टी. पार्क गायत्री नगर प्रताप नगर नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेश वरकडे ब.न. ६८९ मो. नं. ९६३७००५३०३ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०५/०५/२०२३ चे १२.०० वा. चे १३.०० वा. दरम्यान यातील पिडीत मुलगी वय १७ वर्ष १० महीने ही व आरोपी नामे — सचिन काळे वय २४ वर्ष, रा. खैरी लखमा ता. कळमेश्वर हे एकाच गावातील रहीवासी असुन त्याची एकमेकां सोबत ओळख असुन फिर्यादी सोबत आरोपी याने कळमेश्वर मधील नुक्कड कॅफे येथे भेटायला बोलावले व तेथील खोलीत नेवुन तिच्या सोबत जबरदस्तीने शारीरीक संबंध केले त्यामुळे पिडीतेला मासीक पाळी झाली नाही म्हणुन हॉस्पीटल लेकुरवाळे येथील डॉक्टरांनी चेक करून सांगीतले की, गरोदर आहे. म्हणुन फिर्यादी पुन्हा आपले नातेवाईका सोबत नागपुरला पडोळे नरसिंग होम येथे जावुन चेक केले असता तेथील डॉक्टरांनी पिडीत फिर्यादीला गरोदर असल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ भादवि. सहकलम ४, ६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम पो. स्टे कळमेश्वर मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर